### क्रूरताजनक, संतापजनक, किळसवाणे...

# मदरशातील मौलानाचे बालकाशी अनैसर्गिक पाशवी कृत्य

## हातपाय बांधले, तोंडात रुमाल टाकला, त्यानंतर शमविली वासना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** - बसस्थानक मार्गावरील एका मदरशात क्रुरताजनक, संतापजनक आणि किळसवाणा प्रकार उजेळात आला आहे. मदरशाच्या मौलानाने एका 13 वर्षीय बालकाचे हातपाय बांधून त्याच्या तोंडाला रुमाल कोंबत आणि त्याच्याशी पाशवी अनैसर्गिक कृत्य केले. 6 जानेवारी रोजी याप्रकरणी कोतवाली ठाण्याच्या तक्रार दिल्यानंतर शहरात एकच खळबळ उडाली. याप्रकरणात कोतवाली पोलिसांनी आरोपी मदरशातील मौलाना सलमान मुफ्ती (38, न्यू इस्लामपुरा, बिच्छू टेकडी) याच्याविरुध्द गुन्हा नोंदवून, त्याला अटक केली आहे.

मदरशातील मौलाना सलमान मुफ्ती (38, न्यू इस्लामपुरा, बिच्छू टेकडी) याने 2 जानेवारी रोजी रात्री 11 वाजता 13 वर्षीय मुला आपल्या खोलीत बोलावले आणि त्याने



### रात्रभर वेदनांनी विव्हळला बालक

अनैसर्गिक कृत्य केल्यानंतर मौलाना सलमान मुफ्ती (38, रा. उस्मानिया मस्जीद अमरावती,) यांने तेरा वर्षीय बालकाला धमकावले. याबाबत कोणाला काहीही सांगायचे नाही, असे खडसावले. त्यानंतर त्याला खोलीत जाऊन शांतपणे झोपण्याची सूचना केली. दरम्यान रात्रभर तो मुलगा वेदनांनी विव्हळत होता. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून त्या बालकाने मदरसा सोडला आणि थेट आपले गाव गाठले. मुलगा अचानक गावात परतल्याचे पाहून वडिलांनी त्याची विचारपूस केली, त्यावेळी त्याने घडलेला संपूर्ण प्रकार सांगितला.

आरडाओरड करू नये किंवा पळून जाऊ नये, म्हणून, त्याचे हात पाय दुपट्ट्याने बांधले व तोंडात रुमाल कोंबला. त्यानंतर मौलाना सलमान मुफ्तीने आपल्या मोबाईलवर अश्लील अनैसर्गिक कृत्यांचे व्हिडिओ दाखवले आणि त्याच्यासोबत अनैसर्गिक कृत्य केले. याबाबत मुलाच्या वडिलांकडून तक्रार मिळताच कोतवाली पोलिसांनी नेर येथे आयोजित इज्तेमाला उपस्थित असलेल्या मौलाना सलमान मुफ्तीला अटक करून अमरावतीला आणले. त्याची चौकशी केली जात आहे.

### कोतवाली ठाण्यात गुन्हा दाखल

ही बाब मुलाच्या वडिलांना समजताच त्यांनी मुलासह तातडीने सिटी कोतवाली पोलीस ठाणे गाठून मौलाना सलमान मुफ्ती यांच्याविरोधात तक्रार दाखल केली. त्याआधारे बीएनएस कलम 4 (2) व 6 (1) आणि पोक्सो कायद्याच्या कलम 8/12 नुसार फौजदारी गुन्हा नोंदविला. त्यानंतर कोतवाली पोलिसांनी मौलाना सलमान मुफ्ती याचा शोध सुरू केला, त्यावेळी तो नेरमध्ये आयोजित इज्तेमामध्ये दिनी सहभागी होत असल्याचे माहिती पडले. अशा स्थितीत कोतवाली पोलिसांच्या पथकाने नेर गाठून मौलाना सलमान मुफ्ती याला इज्तेमाच्या ठिकाणाहून ताब्यात घेऊन अटक करून अमरावतीला आणले. गेला. जिथे त्याची सध्या चौकशी आणि चौकशी सुरू आहे.

### जुन्या घटनेला उजाळा

शहरातील पश्चिम भागात एका निवासी मदरशामध्ये तिथल्या मुख्याध्यापकाने एका बालिकेवर पाशवी बलात्कार केल्याची घटना काही वर्षांपुर्वी उघडकीस आली होती. याप्रकरणी नागपूरी गेट पोलिसांनी त्या नराधमावर गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली होती. आता घडलेल्या या घटनेने त्या जुन्या घटनेला पुन्हा उजाळा मिळाला आहे.

# तस्करीच्या तीन वाहनांची धडक, 5 गायींचा मृत्यू

## मोर्शी ते चांदूर बाजार रस्त्यावरील घटना

### 23 गायींना जीवनदान

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.6 )**- मोर्शी ते चांदूर बाजार रस्त्यावर सोमवारी पहाटे गोवंश जनावरांना घेऊन जाणाऱ्या वाहनाचा टायर फुटला आणि तीन वाहनांची धडक झाली. या अपघातात पाच गायींचा मृत्यू झाला. बजरंग दल आणि गोवंश प्रेमींनी वाहनातून 23 गायी बाहेर काढून गोरक्षणासाठी पाठवल्या आहेत. सोमवारी पहाटे 5 ते 5.30 च्या दरम्यान झमझम पान कॉर्नरजवळ ही घटना घडली.

माहितीनुसार, मोर्शी ते चांदूर बाजार या मार्गाने जनावरांनी भरलेली वाहने चांदूरबाजारच्या दिशेने येत असल्याची प्रथम माहिती बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांना मिळाली होती. अशा स्थितीत झमझम पान कॉर्नरजवळ अनेक गोप्रेमी जमा झाले.

या मार्गावरून वेगवान वाहने धावत आली. लोकांची गर्दी पाहून तातडीने स्पीड ब्रेकर लावून वाहने थांबविण्यात आली. यावेळी वाहनातील तरुणांनी पिस्तुल व इतर वस्तू फेकल्या. यावेळी एका वाहनाचा टायर फुटला आणि एकामागून एक असलेली तीन वाहने एकमेकांवर आदळली.





वाहनाच्या धडकेने राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या संरक्षक लोखंडी जाळ्याही पडल्या. तवेरा क्रमांक एमएच 31 ईयु 5211, महेंद्र पिकअप क्रमांक एमएच 05 बीके 6562 व पिकअप वाहन क्रमांक एमएच 46 एएफ 6308 अशा तिन्ही वाहनात एकूण 28 गायी होत्या.

या घटनेनंतर सर्व आरोपी तेथून पळून गेले. बजरंग दलाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सर्व गायींना मुक्त केले. यापैकी 5 गायींचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच चांदूरबाजार पोलिसांनी घटनास्थळ गाठून संतप्त जमावाला नियंत्रणात आणून परिस्थिती नियंत्रणात आणली. 5 गायींचे पीएम करण्यात आले. उर्वरित 23 गोरक्षणात पाठवण्यात आले. तिन्ही वाहने पोलीस ठाण्यात आणण्यात आली. वाहनांच्या माध्यमातून आरोपींपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे. एकूण सहा अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही वाहने कोठून येत होती, कुठे जात होती, याचा कोणताही सुगावा अद्यापपर्यंत मिळालेला नाही. ही कारवाई एपीआय विष्णू पांडे, एपीआय वैसाणे, पीएसआय सिद्धू उमाळे, एएसआय अमोल सानप, पोलीस कर्मचारी निकेश गाढवे, सलामे, मिलिंद वाटाणे, रोशन चव्हाण यांनी पार पाडली.

# चायना मांजा विक्री करणारे दोघे ताब्यात

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

### साडेअकरा हजारांचा नायलॉन मांजा जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 6)** - शासनाने प्रतिबंधित केलेला नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या माहुली जहागीर येथील रहिवासी दोघांच्या घरी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने 5 जानेवारी रोजी धाड टाकली. या कारवाईत दोन अब्दुल कुद्दुस अब्दुल रऊफ (30) व मोहम्मद सादीक अब्दुल सत्तार (55, दोन्ही रा. माहुली जहागीर) या आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून 11 हजार 500 रुपयांचा नायलॉन मांजा जप्त करण्यात आला.



या दोघांनी अवैधरित्या विक्रीकरिता आपल्या घरी नायलॉन मांजा ठेवल्याची माहिती गस्तीवर असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पथकाने या दोघांच्या घरी धाड टाकली. झडतीत त्यांच्या घरातून 11 हजार 500 रुपयांचा 49 बंडल नायलॉन मांजा आढळून आला. त्यानुसार मांजा जप्त करून त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर त्यांना पुढील कारवाईसाठी माहुली जहागीर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार, बळवंत दाभणे, गजेंद्र ठाकरे, रवींद्र बावणे, भूषण पेठे, पंकज फाटे, विलास रावते यांनी केली.

# मुलाने आईच्याच दोन्ही हातावर मारले ब्लेड

## मुलीसोबत प्रेमसंबंधाविषयी टोकल्याच्या कारणावरून मारहाण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** - एका मुलीसोबतच्या प्रेमसंबंधाविषयी टोकणार्या आईवर मुलानेच ब्लेडने वार केले आणि तिला लाथाबुक्यांनी मारहाण केली. ही घटना फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चपराशी पुरा परिसरात 5 डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास घडली. जखमी आईच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी आरोपी मुलगा प्रविण प्रेमदास गजभिये (30, रा. चपराशीपुरा) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

महिलेच्या तक्रारीनुसार, आरोपी प्रविण हा त्यांच्या मुलगा आहे. त्याचे एका मुलीसोबत प्रेमसंबंध होते. त्यामुळे मुलीसोबतचे प्रेमसंबंध



ठिक नाही, असे आईने मुलगा प्रविणला म्हटले आणि त्याला समजावून सांगितले. परंतु 5 जानेवारी रोजी दुपारी आई ही अंगण झाडत असताना, मुलगा प्रविण हा घरी आला आणि त्याने आईलाच शिविगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर त्याने जवळील ब्लेड काढून आईच्या दोन्ही हातावर मारून जखमा केल्या तसेच तिला मारण्याची धमकी दिली. त्यामुळे जखमी आईने फ्रेजरपुरा पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली.

# प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थी नागरी सुविधापासून वंचित

## प्रहार जनशक्ती पक्षाच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 6)** - प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना नांदगाव पेठ पावर हाऊस मागे जागा देण्यात आली. त्यानुसार लाभार्थ्यांनी बांधकामही केले. मात्र मागील तीन वर्षापासून वास्तव्य असून अजूनही येथे नागरी सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे तसेच आरोग्यासह जीविताला धोकाही संभवतो. त्यामुळे तत्काळ नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात या मागणीसाठी सोमवारी (दि.6) प्रहार जनशक्ती पक्षाच्या नेतृत्वात शेकडो नागरिक जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले. यावेळी प्रहार शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना निवेदन दिले.

निवेदनानुसार, नांदगावपेठ ग्रामपंचायतीने प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सन 2021- 22 साली घरकुलांचे बांधकाम करण्यासाठी बेघर लोकांना जागा उपलब्ध करून दिल्या. परंतू, आज चार वर्ष लोटले तरी येथील स्थानिकांना विज (इलेक्ट्रीसिटी)



उपलब्ध करून देण्यात आली नसल्याने घरकूल लाभार्थी अजुनही अंधारातच आहे तसेच संपूर्ण परिसरात अंधार पसरलेले आहे. परिसरातील रस्ते अजूनही तसेच कच्चे आहेत. पावसाळ्यात या रस्त्यांची अत्यंत दुर्दशा होते. संपूर्ण रस्ते खड्डेमय आणि चिखलमय होतात. त्यावर चालतांना कसरतच करावी लागत आहे.

सांडपाणी, नाल्यांची व्यवस्था नाही. परिणामी सगळ्यांच्या घरासमोर घाणेरडे पाण्याचे डबके साचले आहे. ज्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विज नसल्यामुळे त्याचा गैरफायदा काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक घेत आहे. या परिसरात रात्री काही बाहेरील नागरीक येवून जुगार खेळणे, दारु पिने, यामुळे नागरिकांना विशेषत महिलांना त्रासदायक झाले आहे. नांदगाव पेठ ग्राम पंचायतीने जी जागा उपलब्ध करून दिलेली आहे ती शेत जमीन व जंगलाला लागूनच आहे. त्यामुळे वन्य प्राणी, सरपटणारे प्राणी घरात शिरतात. नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. असे निवेदनात नमूद केले आहे.

यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा अध्यक्ष छोटू महाराज वसू, महानगर प्रमुख बंटी रामटेके, नितीन शिरभाते, कुणाल खंडारे यांच्यासह दिनेश डोळस, प्रफुल गवई, सुधीर बनसोड, रमेश वाढवे, राजू चंदेल, कमला वाढवे, मंजू ठाकूर, कमला ठाकूर, मंदा नवले, देविदास सावंत, रामेश्वर वाढवे, अरुण वाढवे, सुशीला सहारे, राजेंद्र मुळे, कमलेश नाचणे, पल्लवी राऊत अन्य नागरीक उपस्थित होते.

# लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचविणाऱ्या बहीणी उपेक्षीतच

## अंगणवाडी सेविकांचा प्रोत्साहन भत्ता रखडला



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.6 )**- मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू झाल्यानंतर पात्र महिलांच्या खात्यावर 1500 रुपये जमा झाले. त्यानंतर नव्याने महायुती सरकार सत्तेवर येताच उर्वरित डिसेंबर महिन्याचा हप्तादेखील महिलांच्या खात्यावर जमा करण्यात आला. या लाडकी बहीणींपर्यंत योजना पोहोचविणाऱ्या अंगणवाडी सेविकांना मात्र अद्यापही प्रोत्साहन हप्त्यापासून वंचित आहेत. त्यामूळे अंगणवाडी सेविकांमध्ये सरकारविरुध्द नाराजीचा सूर उमटत आहे.

लाडकी बहीण योजनेपासून महिला वंचित राहू नये, यासाठी अंगणवाडी सेविकांनी दिवस-रात्र अर्ज भरले. यादरम्यान अंगणवाडी सेविकांना विविध अडचणींचा सामना करावा लागला. मात्र तरीही जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर महिलांचा आकडा वाढला. यामुळे अनेक महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाला. लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी शासनाकडून प्रत्येक लाभार्थीमागे 50 रुपये प्रोत्साहन भत्ता अंगणवाडी सेविकांना देण्याची घोषणा सरकारने केली होती. शहरी व ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत. सर्वच अंगणवाडी सेविकांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज भरून दिले. परंतु त्यांना देण्यात येणारा प्रोत्साहनपर भत्ता रखडला आहे.

### अंगणवाड्या सांभाळून भरले होते अर्ज

अंगणवाडी सेविकांनी अंगणवाड्या सांभाळून गावागावात ऑनलाइन अर्ज भरण्याचे काम केले. मात्र, या कामामध्ये दिलेल्या मोबाईलमधील नेटचा वेग कमी असल्याने ऑनलाइन अर्ज भरण्यात अडचणी, अडथळे आले होते. तरीही सर्व अडथळे पार करत सेविकांनी अर्ज भरले.

> वेळ, काळ न बघता, विविध अडचणीचा सामना करीत लाडकी बहीण योजना आम्ही लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविली. मात्र सरकारकडून घोषणा झाली तेव्हापासुन एक रुपयाही सेविकांना दिला नाही. सेविकांनाही आर्थिक चणचण भासते, घरच्या जबाबदाऱ्या असतात. त्यामुळे सेविकांचा प्रोत्साहन भत्ता द्यावा.
>
> **लता राऊत,**
> **अंगणवाडी सेविका कापुसतळणी ता. अंजनगाव.**

# दुचाकी झाडावर आदळून दोन ठार, एक जखमी

## यावली ते माहुली मार्गावर विठ्ठलापूर येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.6)** - संतुलन बिघडून अनियंत्रीत दुचाकी झाडावर आदळल्याने दोघांचा मृत्यू, एक जखमी झाला. गुरुप्रसाद तीर्थलाल उईके (24, रा. चुळाबोह छपानाला ता,मोहखेड जिल्हा छिंदवाडा, ह.मु. माहुली जहागिर) व चालक राजकुमार बालकराम नर्हे (18, रा.चुळाबोह, हल्ली मुक्काम माहुली जहागीर) अशी मृतांची नावे आहेत. तर या अपघातात सविन नथुलार नर्हे (22 रा. चुहाबोळ) हा जखमी झाला आहे. सविन नथुलाल नर्हे, गुरुप्रसाद तीर्थलाल उईके व राजकुमार बालकराम नर्हे असे तिघे जण नांदगाव पेठ एमआयडीसीतील गोल्डन फायबर एलएलपी कंपनीत काम करीत होते. रविवारी दुपारी तीन वाजेपर्यंत त्यांनी कंपनीत ड्युटी केली व त्यानंतर ते आपल्या खोलीवर जाण्यासाठी दुचाकी क्रमांक एमपी 28 झेडजी 2335 वर ट्रिपल सीट निघाले होते. दरम्यान यावलीकडे जात असताना त्यांचे दुचाकीवरून संतुलन बिघडले आणि दुचाकी झाडावर आदळली. त्यामुळे या अपघातात दोन युवकाचा मृत्यू झाला तर एक युवक जखमी झाला. या घटनेची माहिती मिळताच माहुली जहागीर पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले व त्यांनी जखमींना औषध उपचारासाठी पोलिसांच्या गाडीत बसवून जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. यावेळी पोलीस हवालदार, सविता इंगळे, पोलीस शिपाई सुमित चव्हाण, वाहन चालक कुंदन सातपुते उपस्थित होते. या अपघाताची माहिती पोलिसांनी मृतांच्या व जखमीच्या नातेवाईकांना दिली. पुढील तपास माहुली जाहगीर पोलीस करत आहे

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शेतकऱ्यांचा तहसिलदारांच्या कक्षात ठिय्या

## अतिवृष्टी व गारपीटचे अनुदान तत्काळ देण्याची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.6 )**–तालुक्यात नोव्हेंबर, डिसेंबर 2023 मध्ये अतिवृष्टी व एप्रील 2024 मध्ये गारपीट झाली होती. यामध्ये शेतपिकाचे अतोनात नुकसान झाले. या नुकसानीचे तातडीने अनुदान देण्याची मागणी करित पंचायत समितीचे माजी सभापती विक्रम ठाकरे व किसान न्याय हक्क संघर्ष समिती यांचे नेतृत्वात शेतकऱ्यांनी तब्बल दोन तास तहसिलदारांच्या कक्षात ठिय्या आंदोलन केले.

आंदोलनकर्त्यांनी आरोप केला की, शासन, प्रशासन, आजी–माजी आमदारांचा हलगर्जीपणा व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर दुर्लक्ष यामुळे शेतकऱ्यांचे अतिवृष्टी व गारपीटचे अनुदान अडकून पडले आहे. वारंवार मागणी करुनसुध्दा शेतकऱ्यांना अनुदान मिळू शकले नाही. त्यामूळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी विक्रम ठाकरे यांच्या नेतृत्वात तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनाची दखल घेत तहसीलदारांनी ताबडतोब नुकसान भरपाई देण्यासाठी लवकरच एक अहवाल शासनाला पाठविण्याचे आश्वासन गारपीट व अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना दिले. लवकर न्याय न दिल्यास रस्त्यावर उतरू असा इशारा दिला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे , काँग्रेसचे माजी तालुका अध्यक्ष मनोज गेडाम, माजी सरपंच सुधाकर दोड, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष तुषार निकम, किसान न्याय हक्क संघर्ष समितीचे सप्निल खांडेकर उपस्थित होते.

# चुरणी गावात आमदार केवलराम काळे यांचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.6 )**– चुरणी ग्रामपंचायत कार्यालयातील हॉलमध्ये रविवारी( दि.5) मेळघाट विधानसभा मतदारसंघाचे आमदार केवलराम काळे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. विधानसभा निवडणूकीमध्ये दणदणीत विजय प्राप्त झाल्याने आ.केवलराम काळे यांचा चुरणी गावकऱ्यांनी व गावातील लाडक्या बहिणींनी त्यांचा सत्कार केला.

आमदार केवलराम काळे यांनी भाजपा सदस्यता अभियानाबद्दल चुरणी गावातील नागरिकांना माहिती दिली आणि जास्तीत जास्त भाजपा सदस्य होण्यासाठी नागरिकांना व गावकऱ्यांना आमदार केवलराम काळे यांनी बोलताना सांगितले. यावेळी चुरणी गावकऱ्यांनी व युवा कार्यकर्ते यांनी आमदार केवलराम काळे यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी भाजपा जेष्ठ नेते राजेंद्र येवले, आशिष टाले उपसरपंच, शैलेश माल्हा, आलोक अलोकार,



रुपेश भक्ते, सुमीत चावरे, दिपक बेठेकर, राजेश वर्मा, दिनेश चव्हाण, शंकर येवले, सुजित भास्करे, नितीन चावरे, सोनु मालविय, सतिश हरसुले, यशवंत काळे यांचे स्वागत आशिष टाले उपसरपंच चुरणी यांनी केले. मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी उपस्थित गावकऱ्यांना मार्गदर्शन केले व भाजपा सदस्य बद्दल माहिती दिली. यावेळ अनेक ग्रामस्थ व भाजपा कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.



# हेल्मेटधारकाचे गुलाब पुष्पाने स्वागत

## रस्ता सुरक्षा अभियानात हेल्मेट वापराबाबत जनजागृती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.6 )**– येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून राबविण्यात येणाऱ्या रस्ता सुरक्षा अभियानामध्ये आज हेल्मेट बाबत जनजागृती करण्यात आली. नांदगाव पेठ येथिल टोल नाक्यावर येणाऱ्या हेल्मेट वाहनधारक यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. वाहनधारकांमध्ये वाहन चालविताना हेल्मेटची गरज व आवश्यकता का आहे याबाबतचे याबाबतचे जनप्रबोधन प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती



उर्मिला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मोटर वाहन निरीक्षक पल्लवी दौंड, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक सतीश राठोड, गणेश शिरगिरे, वाहन चालक अमित पाल यांनी केले.

# ग्राम महसूल अधिकारी प्रफुल्ल गेडाम यांना सेवानिवृत्ती निरोप

## चांदुर रेल्वे आणि मालखेड येथे कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे,( दि.6 )**– नियत वयोमानानूसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले तालुक्यातील मालखेड येथील ग्राम महसूल अधिकारी प्रफुल्ल गेडाम यांना तहसील कार्यालय चांदुर रेल्वे आणि मालखेड येथील गावकरी, शेतकरी आणि स्थानिक कर्मचारी यांच्या वतीने निरोप देण्यात आला.

यावेळी तहसील कार्यालयाच्यावतीने झालेल्या चांदुर रेल्वे येथे झालेल्या कार्यक्रमात तहसीलदार पूजा माटोडे अध्यक्षस्थानी होत्या. तर मालखेडवासियांनी गावात आयोजित केलेल्या निरोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी सरपंच लता लक्ष्मण पाटील होत्या. निरोप समारंभाच्या या भावस्पर्शी कार्यक्रमात गावाप्रती आणि शेतकऱ्यांप्रती असलेली कार्यतत्परता आणि आपल्या



### इतरांसाठी आदर्श

त्यांची आपल्या कर्तव्याप्रती असलेली निष्ठा, कार्यतत्परता त्यांचा गौरव करणे हे इतर ग्राम महसूल अधिकारी आदर्श निर्माण करण्यासारखे आहे, असे प्रतिपादन तहसीलदार पूजा माटोडे यांनी केले.

कर्तव्याप्रती असलेली निष्ठा उल्लेखनीय असल्याचे यावेळी विविध मान्यवरांनी आपल्या भाषणातून सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रफुल्ल गेडाम यांचा शाल व श्रीफळ आणि देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. यानंतर प्रफुल्ल गेडाम यांनी आपला

जीवनप्रवास सर्वांसमोर सादर केला त्यामध्ये त्यांना लाभलेले अनेक जणांचे सहकार्यही त्यांनी विशद केले. गावातील विविध मान्यवर मंडळी, कार्यरत कर्मचारी,अधिकारी सरपंच लता पाटील, उपसरपंच गोपाल अळणे, पोलीस पाटील एम व्ही माहुरे, ग्रामपंचायत सदस्य कल्पना निचत, लता डोक,अनिल सोनटक्के, प्रणिता डकरे, मृणालिनी देशमुख, विनोद निचत यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता परिश्रम घेतले तर संतोष इंगोले यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर आभार कृषी सहाय्यक पवनसिंह राठोड यांनी केले.

# वाळू माफीया जोरात, अधिकारी जोमात, सर्वसामान्य कोमात!

## सरकारी तिजोरीत जाणारा लाखो रुपयांचा महसूल बुडीत

**विलास पाटील**

**वरुड, ( दि.6 )**– काही वर्षांपासून तालुक्यातून अवैध वाळू माफीया दर महीण्याला शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसुल बुडवित आहे. दूसरीकडे परिवहन, महसुल व पोलीस प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी दर महीण्याला हप्ताच्या नावावर लाखो रुपयांची पठाणी वसुली करीत असल्याचे रेती माफीया नाव न सांगण्याच्या अटीवर स्पष्ट सांगतात. परीणामी सर्व सामान्य नागरीकांची रेती खरेदी करतांना थेट फसवणुक केल्या जात असुन मनमानी भावाने तालुक्यात रेती विक्री केल्या जात आहे. हा प्रकार वाळू माफीया जोरात, अधिकारी जोमात, सर्वसामान्य कोमात, असा झाला आहे. न्याय मागावा तरी कोणाकडे असा प्रश्न सर्व सामान्य नागरीकांसमोर उपस्थित होत आहे.

प्राप्त माहीतीनुसार, तालुक्यातील विविध रेती घाटांसह मध्यप्रदेशातील रेतीघाट वरून मोठ्या प्रमाणात अवैध रेतीची वाहतुक तालुक्यातुनच राज्य व राष्ट्रीय महामार्गावरून केल्या जात असल्याची चर्चा आहे. दर दिवसाला 24 तासात 100 चे जवळपास ओव्हरलोड डंपर, ट्रक, ट्रॅक्टर भरून रेतीची अवैधरीत्या वाहतुक होते. या वाहतूकीतून शासनाचा दर



महीण्याला कोट्यावधी रुपयांचा महसुल बुडविला जात आहे. याकरीता दर महीण्याला या रेती माफियांकडून, आरटीओ नाका, महसुल, पोलीस विभागातील अनेक अधिकारी व कर्मचारी आमचे कडून लाखों रुपयांची वसुली हप्ताच्या नावावर करित असल्याचे काही रेती माफीया सांगतात. हा सर्व प्रकार सुरळीत चालत असतांना काही स्वयंघोषीत समाजसेवकसुद्धा धमक्या देत या अवैध धंद्यात हात धूवून घेत आहे. यामध्ये हात ओले न झाल्यास हेच समाजसेवक वरिष्ठांकडे तक्रारी करून उपोषण व आंदोलन करण्याचा इशारा देतात. यामुळे दबावात आलेल्या वरिष्ठांकडून अवैध रेती माफीयांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश दिल्या जाते. प्रशासनातील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी या रेती माफीयांवर कारवाईचा बडगा उगारतात. यामुळे दर महीण्याला लाखों रुपये वाटप करणारे रेती माफीया व प्रशासनातील अधिकाऱ्यांमध्ये वाद निर्माण होउन या रेती माफियांकडुन अधिकारी व कर्मचाऱ्यांवर थेट प्राणघातक हल्ले केल्या जाते. याबाबत नंतर रेती माफीयां विरुद्ध गुन्हे सुद्धा दाखल केल्या जाते. मात्र ओव्हरलोड अवैध रेती वाहतुक काही केल्या तालुक्यात थांबत नाही हे विशेष. परीणामी सर्व सामान्य नागरीकांची रेती खरेदी करतांना थेट फसवणुक केल्या जात आहे. नागरिकांना अव्वाच्या सव्वा भावाने तालुक्यात रेती खरेदी करावी लागते. जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षकांनी या प्रकाराकडे जातीने लक्ष घालून सर्व सामान्य नागरीकांना न्याय मिळवुन द्यावा अशी मागणी आता शहर व तालुक्यातुन मोठ्या प्रमाणावर केल्या जात आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे हा स्नेहसंमेलनाचा एकमेव हेतु!

## क्षितिज अभ्यंकर यांचे प्रतिपादन

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.8 )**– विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा याकरिता अध्ययन व अध्यापनासोबतच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे आवश्यक असते, विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे हा एकमेव हेतु या स्नेहसंमेलनाचा असतो, जो या आयोजनातून साध्य होतो, असे प्रतिपादन राहूल व्यायाम प्रसारक मंडळाचे अध्यक्ष क्षितीज अभ्यंकर यांनी केले. राहुल व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती द्वारा संचालीत परतवाडा येथील सिध्दार्थ विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय (एचएससी व्होकेशनल) येथे नुकताच स्नेहसंमेलन कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात क्षितीज अभ्यंकर बोलत होते.



या प्रसंगी पोलीस स्टेशन परतवाडा येथील पोलीस उपनिरिक्षक संजिवनी पुंडगे, राहुल व्यायाम प्रसारक मंडळ चे सचिव गजाननराव वानखडे, नगर परिषद केंद्र क्रमांक एक च्या केंद्र प्रमुख शारदा नवलकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचा शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. क्षितीज अभ्यंकर पुढे म्हणाले की, संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर यांनी तळागळातील विद्यार्थ्यांना शिक्षण सहज उपलब्ध व्हावे या करीता रक्ताचे पाणी केले. ग्रामिण व शहरी भागात सुसज्ज भौतिक सुविधापुर्ण अश्या शाळेच्या इमारती उभारल्यात. त्यामुळे या ठिकाणी उपस्थित पालकांना विनंती आहे की, आपल्या मुला–मुलींना शिक्षणाचे महत्व सांगा, कारण आज जाती व धर्मात भेद पाळला जात नाही. तसाच मुलां–मुलींमध्ये भेदाभेद राहीला नाही.

या शाळेतुन आज पर्यंत अनेक मुले व मुली शासकीय सेवेत कार्य करीत आहेत. तसेच दरवर्षी उत्कृष्ट निकालासह क्रिडा क्षेत्रात ही राष्ट्रीय स्तरावर मुले–मुली मजल मारतांना आपण अनुभवत आहोत. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा अंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान अंतर्गत संस्थेच्या चार शाळा तालुक्यातुन पहील्या दुस–या तिस–या क्रमांकावर तर सिध्दार्थ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय परतवाडा या शाळेला जिल्हयातुन दुसरा क्रमांक चा बहुमान प्राप्त झाला आहे असेही ते म्हणाले. परतवाडा येथील पोलीस उपनिरिक्षक संजिवनी पुंडगे यांनी विद्यार्थ्यांसोबत सुरक्षेच्या विषयावर हीतगुज करत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांचे पालक मोठया संख्येने उपस्थित होते. यासह मुख्याध्यापक गोपाल अभ्यंकर, माजी प्राचार्य, संजय गुल्हाणे, अधिक्षक प्रमोद अभ्यंकर, सागरसिंग चव्हान, गोपाल खडसे, प्रर्यवेक्षक दीपक कळसकर, विभाग प्रमुख जयश्री खडके, पर्यवेक्षक दीपक कळसकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# बिलनपूऱ्यातील नागरिकांना घरकुल द्या!

## नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.6 )** – रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) च्यावतीने अचलपूर शहरातील बिलनपुरा दुल्हा गेट परकोट येथील नागरिकांचे घरकुल मंजूर करण्यासाठी मुख्याधिकारी अचलपूर यांना निवेदन देण्यात आले. बिलनपुरा दुल्हा गेट येथील नागरिक मागील काही वर्षापासून घरकुल साठी निवेदन देत आहे. यापुर्वी नागरिक या



रास्त मागणीकरिता आंदोलनाच्या पवित्र्यात होते, परंतु आचारसंहितामुळे हे आंदोलन रोखण्यात आले. घरकुलमूळे अनेक कुटुंबे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत. त्यांना मूलभूत हक्क म्हणून घरकुल उपलब्ध होणे आवश्यक आहे.

निवेदन आरपीआय शहराध्यक्ष किशोर मोहोड यांच्या नेतृत्वात बिलनपूरा येथील नागरिकांनी दिले. मागणी तातडीने पुर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशाराही या नागरिकांनी यावेळी दिला.

# तूरीचा 10 हजाराचा भाव आला 7 हजारावर

## 'बटेंगे तो कटेंगे' या नाऱ्यात शेतकरीच कटला?

**बादल डकरे**

**चांदूर बाजार,( दि.6 )** – सोयाबीन ची उत्पादन क्षमता कमी झाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात तूरीची लागवड केली. यावर्षी चांगल्या प्रकारे तुरीचे उत्पादन होण्याची आशा शेतकऱ्यांना होती. तुरीच्या चांगल्या पिकावर वर्षभराचे आर्थिक नियोजनही शेतकऱ्यांनी आखले होते. परंतू हे आर्थिक नियोजन रातोरात धुळीस मिळाले. कारण तुर पुर्णपणे बाजारात येण्यापुर्वीच तुरीचे भाव क्विंटलमागे 2500 रुपयांनी घटले. तुरीचा बाजार पुढील काही महीने 7 हजार 500 ते 8 हजार रुपयांच्या दरम्यान राहणार असल्याचा अंदाज तज्ञांनी व्यक्त केला आहे. बटेंगे तो कटेंगे नाऱ्यावर ज्या सरकारला निवडूण देण्यात आले, ते



सरकार आता शेतकऱ्याला कापायला निघाले.

नोव्हेंबरमध्ये तुरीला सरासरी 10 हजार ते 10 हजार 500 रुपये भाव होता. आता मात्र तूर बाजारांमध्ये सरासरी 7 हजार 500 ते 8 हजार रुपयांच्या दरम्यान विकली जात आहे. म्हणजेच तुरीच्या भागात महिनाभरातच दोन ते अडीच हजार रुपयांनी भाव कमी झाले आहेत. यंदाच्या खरिपातील गेल्यावर्षीपेक्षा उत्पादन वाढण्याची शक्यता असली तरी बाजारभाव खूपच खाली जावू नये अशी इच्छा शेतकऱ्यांची आहे. आवकचा दबाव वाढल्यानंतर बाजार 7 हजार 500 रुपयांच्या दरम्यान येऊ शकतो. पण यंदा सरकारकडेही तूर नाही. सरकारने शेतकऱ्यांची पूर्ण तूर हमीभावाने खरेदीचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे खुल्या बाजारात तुरीचा बाजारात जास्तच कमी झाला, तर शेतकरी हमीभावाने तूर देतील. त्यामुळे यंदा हमीभावाचा मजबूत आधार तूर बाजाराला असेल. परिणामी तुरीचा बाजार यंदा हमीभावाच्या खाली जाण्याची शक्यता कमीच आहे. आवकेचा दबाव कमी झाल्यानंतर दरात पुन्हा सुधारणा होऊ शकते.

नुकत्याच झालेल्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात तुरीची आवक आणि भाव कमी यावर एकही लोकप्रतिनिधी बोलले नाही. राज्यात विधानसभा निवडणुकीत 'बटेंगे तो कटेंगे' या घोष वाक्याचा फायदा भाजप झाला. मात्र त्यांच्या या नाऱ्यात मात्र शेतकरी मात्र तुरीच्या हमीभाव मध्ये तसेच आर्थिक अडचणीत कटला गेला. मग केंद्रात आणि राज्यात हिंदुत्ववादी सरकार असताना हिंदू शेतकरी यांचा विचार न होणे याबाबत तालुक्यातील हिंदू शेतकरी यांच्या मध्ये रोष पहायला मिळत आहे.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे शुध्दोधन समाधान आठवले यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येने प्रमाणे,

मिळकतीचे वर्णन मौजे सावरखेड, ग्रामपंच्यायत मालमत्ता क्रं. 519, वार्ड क्रं. 3, ता. मोर्शी, जिल्हा. अमरावती.

**चतु: सीमा:** पूर्व– सरकारी रस्ता, उत्तर– खाली जागा, पश्चिम– खाली जागा, दक्षिण– सरकारी रस्ता.

सदर मिळकत नामे शुध्दोधन समाधान आठवले यांना ग्रामपंच्यायत सावरखेड यांचा तपशील आणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहे तसेच वरील वर्णनाची नमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे. त्यानंतर त्यांनी PIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD. BR AMRAVATI. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी/पतसंस्था/ सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय–नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 (सात) दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
Advocate
रवींद्र र वाटाणे
स्नेहगंधा कॉलनी,
अमरावती मो. नं. 9823698745